महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

मंडळाच्या आस्थापनेवरील पदांच्या सेवाप्रवेश नियमास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्र. केव्हीबी-१०९७/[६६५४]/उद्योग-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ६ जानेवारी, १९९९

वाचा:- १] मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. कार्या-४-अ/आस्था-२/से.भ.नि./५३१११ दिनांक २३ फेब्रु. १९९८.

२] महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या दिनांक - २८.१.९८ रोजी झालेल्या ३३४ व्या मंडळ सभेतील निर्णय क्र. ६

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या मंडळाच्या आस्थापने-वर वेळोवेळी निर्माण करण्यात आलेल्या वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३, आणि वर्ग-४ या संवर्गातील पदांचे सेवाप्रवेश नियम सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे.

प्रस्तुत सर्व संवर्गासाठी राज्य शासनाने विहित केलेले सरळसेवा प्रवेश/पदोन्नतीचे/प्रतिनियुक्तीचे नियम वेळोवेळी मंडळास बंधनकारक राहतील. तसेच सरळसेवा प्रवेशाने/ प्रतिनियुक्तीने नियुक्ती दिल्यास शर्ती व अटी परिविक्षा कालावधीतील वेतन इ. बाबी शासनाच्या नियमानुसार राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[आर. बी. कांबळे]
शासनाचे उप सचिव.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई
विकास आयुक्त [उद्योग], उद्योग संचालनालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा], मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा], नागपूर.
वरिष्ठ उप महालेखापाल [पडताळणी], बाह्य लेखा परिक्षा विभाग, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
कार्यासन, उद्योग-६ [निवड नस्ती]

९१०

३३४
१०

विषय :- मंडळाच्या पुणे येथील हातकागद संस्थेतील प्रशिक्षण व उत्पादन विभागाच्या कर्मचा-यांचे सेवाभरती नियमाबाबत ...

मंडळाचे हातकागद संस्था, पुणे येथे विस्तार, प्रशिक्षण व उत्पादन असे एकूण ३ विभाग आहेत. विस्तार विभागातील पदे शासनाने मंजूर केली असून त्याबाबतचे सेवाभरती नियम हे मंडळाच्या आस्थापनेवरील पदांच्या सेवाभरती नियमाशी संबंधित आहे.

प्रशिक्षण व उत्पादन विभागाचे पदे शासनाची मंजूर पदे नाहीत. प्रशिक्षण विभागाची पदे ही खादी आयोगाकडून प्रशिक्षणा अंतर्गत मिळणा-या १०० टक्के अनुदानातून निर्माण करण्यांत आली आहेत. तसेच उत्पादन विभागाची पदे ही मंडळाने निर्माण केलेली असून त्याबाबतचा खर्च हा उत्पादनापासून मिळणा-या नफ्यामधून केला जातो.

प्रशिक्षण व उत्पादन विभागाची पदे ही मंडळाच्या आस्थापनेवरील पदाशी निगडीत नसल्यामुळे त्यांचे सेवा भरती नियम स्वतंत्र करण्यांत आले ; सदर सेवाभरती नियम पाहता त्यात काही प्रमाणात त्रुटी असल्यामुळे सुधारणा करणे आवश्यक आहे. तेव्हा प्रशिक्षण व उत्पादन विभागाचे सध्या असलेल्या सेवाभरती नियमात थोडाफार बदल करून सुधारित सेवाभरती नियम प्रस्तावित केले आहेत, त्यास मंडळाने मान्यता द्यावी.

एसएसए. १६/१/

## महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आस्थापनेवरील विविध पदांचे सेवाभरती नियम

| अ क्र. | पदांचे नाव व वेतन श्रेणी | मंजूर पदे | सेवा भरतीची पध्दती | वयोमर्यादा | | शैक्षणिक पात्रता | अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण | अनुसूचित जाती, जमाती व इतर | | | |
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी (वर्ग १) | १ | शासकीय सेवेतून प्रतिनियुक्तीवर | | | | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी. | |
| २. | अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी | १ | शासकीय सेवेतून प्रतिनियुक्तीवर | | | वाणिज्य शाखेतील पदवीधर तथा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | लेखा अधिकारी/ लेखा व लेखा परिक्षण अधिकारी या पदावरील ३ वर्षांचा अनुभव (महालेखाकार / अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय / कोषागार संचालनालय या कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्राधान्य. | |
| टीप :- महालेखाकार कार्यालयातून सहाय्यक महालेखापाल या पदावरील अधिकारी उपलब्ध होण्यास अडचणी लक्षात घेता हा बदल सुचविण्यात आला आहे. | | | | | | | | |
| ३. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (वर्ग १) २२००-७५-२८००-द.रो.१००-३७०० | ३ | शासकीय सेवेतून प्रतिनियुक्तीवर किंवा<br><br>बढतीने | — | | पदवी तथा तत्सम परिक्षा उत्तीर्ण | शासनाकडील वर्ग २ पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br><br>(मंडळातील वर्ग-२ चे अधिकारी (संचालक मध व संचालक हातकागद यांचेसह) ज्येष्ठतानुसार व गुणवत्तेनुसार बढतीस पात्र असतील.) | ३३ टक्के पेक्षा अधिक पदे प्रतिनियुक्तीने भरली जाणार नाहीत |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | लेखा व लेखा परिक्षण अधिकारी (वर्ग-२) २२००-७५-२८००-द.से. १००-३७०० | १ | शासकिय सेवेतून प्रतिनियुक्तिवर<br><br>किंवा | | | वाणिज्य पदवीधर किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | महालेखाकार / अधिदान व लेखा अधिकारी / कोषागार संचालनालय येथील सहा लेखा अधि./ सहा लेखा परिक्षण अधिकारी या पदावरील कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव. | |
| | | | बढतीने | | | | मंडळातील सहा लेखा व ले.प. अधि. या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव आणि वाणिज्य शाखेतील पदवीधर आवश्यक. | |

टिप : १. प्रतिनियुक्तिवर येणाऱ्या सहा लेखाधिकारी व सहा लेखा परिक्षण अधिकारी यांना अनुभव जुन्या सेवा भरती नियम पुस्तिकामध्ये दर्शविला नव्हता तो येथे दर्शविण्यात आला आहे. मंडळाच्या वर्ग-२ या संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीची संधी मिळावी म्हणून दुरुस्ती सुचविण्यात येत आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | प्रसिध्दी अधिकारी (वर्ग-२) २२००-७५-२८००-द.से. १००-३७०० | १ | सरकारी सेवेतून प्रतिनियुक्तिवर<br><br>किंवा<br>निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | मराठी हा मुख्य विषय घेवून पदवी परिक्षा उत्तीर्ण आणि वृत्तपत्र विद्येतील जाहिरातव्यवस्थापन पदविका | शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयात किमान वर्ग-२ च्या पदावर ५ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br><br>वृत्तपत्र व्यवसायातील किंवा जाहीरात व प्रसिध्दीशी संबंधीत कार्याचा ५ वर्षांचा अनुभव | |

टीप :-१. प्रसिध्दी अधिकारी हे पद वर्ग-१ चे अपग्रेड झाले असून एकाकी पद आहे त्यामुळे पदोन्नती मालिका नसल्यामुळे बढतीने नमूद करण्यात आले नाही

२. क्रीडांगवाडा मंडळ कर्मचाऱ्यांसाठी शिथीलक्षम (निवडीसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | सहा.मुख्य कार्यकारी अधिकारी/ सहा. लेखा व लेखा परिक्षण अधिकारी/ जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी (वर्ग-२) २०००-६०-२३००-द.रो. ७५-३२००-१००-३५०० | ३४ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | पदवीधर किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण | प्रशासन/बँकींग/शासकिय ह[illegible] परिक्षण/ग्रामोद्योग या क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा अनुभव | ५० टक्के निवडीने |
| | | | बढतीने | | | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | १. मंडळाची खाते परिक्षा उत्तीर्ण.<br>२. बढती देताना खालील संवर्गापुढे नमुद केलेला किमान अनुभव आवश्यक राहील. ज्येष्ठ अधिक्षक/ज्येष्ठ लेखापाल/ ज्येष्ठ लेखा परिक्षक/सांख्यिकी सहाय्यक आणि ज्येष्ठ राज्य संघटक - ३ वर्षांचा अनुभव | ५० टक्के बढतीने. |
| टीप: १. ज्येष्ठ अधिक्षक/ज्येष्ठ लेखापाल/ज्येष्ठ लेखा परिक्षक/ सांख्यिकी सहाय्यक/ज्येष्ठ राज्य संघटक या पदावरील वेतनश्रेणीची कुंठीतता घालविण्यासाठी व या पदावरील मंडळ कर्मचाऱ्यांना बढतीची संधी सम प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासाठी बढतीची टक्केवारी सुधारण्यांत आली आहे.<br>२. ज्येष्ठ लघुलेखक हे तांत्रिक स्वरुपाचे पद असल्यामूळे विकासात्मक कामासाठी या पदासाठी पदोन्नती दिल्यास अशा अधिकाऱ्याच्या पदासाठी याचा उपयोग होणार नाही म्हणून ज्येष्ठ लघुलेखकाचा येथे पदोन्नतीसाठी विचार केलेला नाही | | | | | | | | |
| ७. | ज्येष्ठ लघुलेखक (वर्ग -३) २०००-६०-२३००-द.रो. ७५-३२०० | १ | बढतीने | | | १. एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२. मराठी किंवा इंग्रजी लघुलेखन गती प्रति मि १२० शब्द व इंग्रजी टंकलेखन गती प्रति मिनिट ५० शब्द, किंवा मराठी टंकलेखन-४० शब्द प्रति मिनिट (सरकारमान्य पदविका परीक्षा उत्तीर्ण) | लघुलेखक या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | ज्येष्ठ लेखापाल/ज्येष्ठ लेखा परिक्षक (वर्ग-३) १६४०-६०-२६००-द.रो. ७५-२९०० | १ | बढतीने | | | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | मंडळाच्या लेखापाल पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. याबाबत मंडळाच्या संबंधीत विभागीय परिक्षा उत्तीर्ण असला पाहिजे. | |
| | ज्येष्ठ अधिक्षक १६४०-६०-२६००-द.रो. ७५-२९०० | ७ | बढतीने | | | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | सहा. जिग्राअ/प्रसिध्दी सहा. या पदावरील ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | |
| ९. | सांख्यिकी सहाय्यक (वर्ग-३) १६४०-६०-२६००-द.रो. ७५-२९०० | २ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | सांख्यिकी विषय घेऊन पदव्युत्तर किंवा सांख्यिकी विषय घेवून पदवी। परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य. | सांख्यिकी विषयातील अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | ५० टक्के निवडीने |
| | | | बढतीने | | | | ज्येष्ठ अन्वेषक पदाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. | ५० टक्के बढतीने (सदर पदे निवडीने उपलब्ध न झाल्यास बढतीने भरली जातील) |
| १०. | लघुलेखक (निम्न श्रेणी) १६४०-६०-२६००-द.रो.७५-२९०० | ५ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १. एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२. इंग्रजी लघुलेखन गती प्र.मि १०० शब्द व टंकलेखन गती ४० शब्द प्र.मि. (सरकारमान्य पदविका परीक्षा उत्तीर्ण)<br>२(अ) मराठी लघुलेखन गती प्र.मि. ८० शब्द व मराठी टंकलेखन गती प्र.मि.३० शब्द (सरकारमान्य पदविका परीक्षा उत्तीर्ण) | | |
| | | | बढतीने | | | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण | मंडळातील लघुटंकलेखक या पदाचा ५ वर्षांचा अनुभव | |

टीप:- मंडळातील लघुटंकलेखकांना बढतीची संधी उपलब्ध व्हावी व त्यांच्या वेतनश्रेणीतील कुंठितता घालविण्यासाठी या पदावरील कर्मचाऱ्यांना ५ वर्षाच्या अनुभवाच्या आधारे लघुलेखक या पदावर ६० टक्के बढतीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. | कनिष्ठ अधिक्षक/लेखापाल/लेखा परिक्षक (वर्ग-३) (१४००-४०-१६००-५०-२३००-द.रो.६०-२६०० | ४३ | वढतीने | | | १. एस.एस.सी किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२. मंडळाची लेखा चाचणी परिक्षा उत्तीर्ण<br>(मंडळाच्या नियमानुसार या परिक्षेतून ज्या कर्मचाऱ्यांना सूट आहे ते या पदोन्नतीला पात्र राहतील)<br>मंडळ कर्मचाऱ्यातील वाणिज्य शाखेतील पदवीधरांना सदर लेखा चाचणी परिक्षेतून सूट देण्यात आली आहे. | ज्येष्ठ सहाय्यक/दुय्यम लेखा परिक्षक अभिलेखापाल या पदाचा ३ वर्षांचा अनुभव. | |
| १२. | प्रसिध्दी सहाय्यक (वर्ग-३) १४००-४०-१६००-५०-२३००-द.रो.६०-२६०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | मराठी हा मुख्य विषय घेऊन पदवी परिक्षा उत्तीर्ण तसेच जाहिरात व प्रसिध्दी क्षेत्रातील पदविका असल्यास प्राधान्य. | वृत्तपत्र व्यवसायातील प्रसिध्दीच्या कामातील २ वर्षाचा अनुभव. | |

टीप :- सदरचे पद एकाकी पद असल्यामूळे व या पदाला वृत्तपत्र विषयक/प्रसिध्दी विषयातील अनुभवाची आवश्यकता असल्यामुळे तसेच मंडळातील ज्येष्ठ सहाय्यक या पदाकडून या अटीची पूर्तता होण्याची शक्यता नसल्याने वढतीने भरावयाचे पद वगळण्यात आले आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक (वर्ग-३) १४००-४०-१६००-५०-२३००-द.रो.-६०-२६०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १. एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२. मराठी लघु टंकलेखक गती प्रती मि.८० शब्द मराठी टंकलेखन गती प्रति मि.३० शब्द सरकारमान्य (पदविका) परिक्षा उत्तीर्ण. | स्वीय सहाय्यक या पदाच्या कामाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. | |

टीप: सध्याचे प्रथेप्रमाणे मंडळाचे अध्यक्ष आपल्या इच्छेनुसार स्वीय सहाय्यक म्हणून मंडळातील कर्मचारी किंवा अन्य व्यक्तींची नेमणूक करतात म्हणून या पदावर बढती देणे योग्य ठरत नाही. बढती दिल्यास ते कायमस्वरुपी राहते म्हणून मंडळाने हे पद सध्या रिक्त ठेवले आहे. मा.अध्यक्षांचे इच्छेनुसार भरले जाते.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४. | ज्येष्ठ अन्वेषक (सांख्यिकी) (वर्ग-३) १४००-४०-१६००-५०-२३००-द.रो.-६०-२६०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | सांख्यिकी विषय घेऊन पदवी परिक्षा उत्तीर्ण. | सांख्यिकी विषयातील अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | |
| | | | बढतीने | | | एस.एस.सी.किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. बढतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीने पद भरण्याची मुभा राहील. | अन्वेषक पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| टीप: ज्येष्ठ अन्वेषक पदावर ज्येष्ठ सहाय्यकांतून बढतीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. सबब ज्येष्ठत्वानुसार स्वतंत्रपणे करणे आवश्यक नाही. | | | | | | | | |
| १५. | सहा.जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी (वर्ग-३) १४००-४०-१८००-द.रो.५०-२३०० | २१ | बढतीने | | | एस.एस.सी.किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | ज्येष्ठ औद्योगिक पर्यवेक्षक/ विभागीय निरिक्षक या पदावरील ३ वर्षांचा अनुभव. | |
| १६. | राज्य संघटक<br>१) ज्येष्ठ राज्य संघटक (वर्ग-३) : १६४०-६०-२६००-द.रो. ७५-२९०० | २ | बढतीने | | | कनिष्ठ राज्य संघटक/ सहा.जि.ग्रा.अ. या पदावरील ३ वर्षाचा अनुभव. | १. कनिष्ठ राज्य संघटक या संवर्गातून ५० टक्के.<br>२. खादी व ग्रामोद्योग अंतर्गत असलेल्या उद्योगातील प्रशिक्षित सहा. जिल्हा ग्रामो. अधिकारी या संवर्गातून ५० टक्के. | |
| | २) कनिष्ट राज्य संघटक (वर्ग-३) १४००-४०-१६००-५०-२३००-द.रो.६०-२६०० | ३ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १. पदवीधर.<br>२. खादी आयोगाचे पटलावर असलेल्या उद्योगातील प्रशिक्षित उमेदवार. | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७. | ज्येष्ठ सहा./दुय्यम लेखा परिक्षक/अभि. लेखापाल/ रोखपाल (वर्ग-३) १२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४० | ७४ | वढतीने | | | एस.एस.सी. किंवा त्यान परिक्षा उत्तीर्ण. १) मंडळाची ज्येष्ठ सहा. खाते परिक्षा उत्तीर्ण (मंडळाच्या नियमानुसार या परिक्षेतून ज्या कर्मचा-यांना सूट आहे ते या पदोन्नतीला पात्र राहतील) | संबंधीत पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. | ही पदे खालील संवर्गातून प्रत्येकी २ हक्के प्रमाणे भरण्यात येतील. १) कनिष्ठ सहाय्यक २) सचिव |
| टीप: सचिवांना पदोन्नतीची पुढील संधी उपलब्ध नसल्याने त्यांना आतापर्यंत औद्योगिक पर्यवेक्षक या संवर्गात संवर्ग बदल देण्यात येत होता. आता त्याच अर्टीवर त्यांना कनिष्ठ सहाय्यक या संवर्गात संवर्ग बदल देण्यात यावा. यामुळे सचिवांना मंडळाची सहाय्यक व ज्येष्ठ सहाय्यक परिक्षा पास करुन पुढील पदोन्नती उपलब्ध होऊ शकेल. तसेच कनिष्ठ सहाय्यक या पदांची रिक्त होणारी पदे सचिवांच्या संवर्ग बदलामुळे भरली जाण्याची शक्यता आहे. | | | | | | | | |
| १८. | ज्येष्ठ औद्योगिक पर्यवेक्षक/ विभागीय निरीक्षक (वर्ग-३) १२००-३०-१५६०-४०-२०४०) | ३३ | वढतीने | | | | औद्योगिक पर्यवेक्षक या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव. | |
| १९. | अन्वेषक (वर्ग-३) १२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | सांख्यिकी विषयासह बारावी परिक्षा उत्तीर्ण. | सांख्यिकी कामातील अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | |
| २०. | मुख्य टंकलेखक (वर्ग-३) १२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४० | १ | वढतीने | | | १. एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण २. मराठी टंकलेखन गती प्रति मि.३० शब्द व इंग्रजी टंकलेखन गती प्रति मि.४० शब्द (सरकारमान्य पदविका परिक्षा उत्तीर्ण) | टंकलेखक या पदावरील कामाचा ५ वर्षांचा अनुभव (ज्येष्ठतेनुसार) | |
| टीप: टंकलेखन पदाचा ३ वर्षांचा अनुभव कमी वाटत असल्याने ५ वर्ष प्रस्तावित करण्यात येत आहे. | | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१. | लघुटंकलेखक (वर्ग-३)<br>१२००-३०-१५६०-<br>द.रो.४०-२०४० | २ | निवडीने | १८<br>ते<br>३० | १८ ते<br>३५ | १) एस. एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण.<br>२) मराठी लघुलेखन गती प्रती मि. ६० शब्द व मराठी टंकलेखन गती प्रति मि.३० शब्द.<br>(सरकारमान्य पदविका परिक्षा उत्तीर्ण) शैक्षणिक पात्रते बरोबर इंग्रजी लघुलेखन गती प्रति मि.८० शब्द व टंकलेखन गती प्रति मि.४० शब्द असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य | | ही पदे भरताना ५० टक्के मंडळाकडील [illegible] यापैकी शैक्षणिक पात्रता आहेत अनुषंगिक पात्रता पूर्ण करीत असल्यास प्राधान्याने भरण्यात यावीत अशा कर्मचाऱ्यांना वयाची अट [illegible] नाही |
| २२. | दुरध्वनी चालक<br>(वर्ग-३)<br>९७५-२५-११५०-<br>द.रो.३०-१६६० | १ | निवडीने | १८<br>ते<br>३० | १८ ते<br>३५ | १) एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण.<br>२) दुरध्वनी चालकाचे मान्यता प्राप्त संस्थेचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (अनुभव असल्यास प्राधान्य). | | |
| २३. | टंकलेखक (वर्ग-३)<br>९७५-२५-११५०-<br>द.रो.३०-१६६० | ११ | निवडीने | १८<br>ते<br>३० | १८ ते<br>३५ | १) एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण.<br>२) मराठी टंकलेखन गती प्रति मि.३० शब्द, इंग्रजी टंकलेखन गती प्रती मि. ४० शब्द.<br>(शासन मान्य पदविका परिक्षा उत्तीर्ण) | | |
| २४. | प्रचार सहाय्यक<br>(वर्ग-३)<br>९५०-२०-११५०-<br>द.रो.२५-१५०० | १ | निवडीने | १८<br>ते<br>३० | १८ ते<br>३५ | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | सिने यंत्रचालन, प्रचार व प्रसिध्दी माध्यमातील कामाचा २ वर्षाचा अनुभव. | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५. | कनिष्ठ सहाय्यक/ सहाय्यक तथा टंकलेखक (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | ७५ | निवडीने/ संवर्गबदलाने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १) एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. २) इंग्रजी टंकलेखन गती प्रति.मि. ४० व मराठी टंकलेखन गती प्रति.मि. ३० शब्द (शासनमान्य पदविका परिक्षा उत्तीर्ण) | | १) संवर्ग बदलाने सचिव पदातून संवर्ग बदल करताना त्यांनी ज्येष्ठता लक्षात घेऊन इंग्रजी/मराठी टंकलेखनाची शासनमान्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. परंतु [illegible] संवर्ग बदल हा ५० टक्केपेक्षा जास्त [illegible] नाही. २) वर्ग-४ संवर्गातून [illegible] नियमानुसार पदोन्नती देण्याची [illegible] |
| टीप: सचिव संवर्गातून संवर्ग बदल करताना सचिव या पदास पुढे बढतीच्या संधी उपलब्ध नसल्याने संवर्ग बदल देण्यात आला आहे. परंतु यासाठी सचिव पदावर किमान ५ वर्षे सेवा आवश्यक आहे. | | | | | | | | |
| २६. | औद्योगिक पर्यवेक्षक (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | १६२ | निवडीने/संवर्ग बदलाने | १८ ते ३० | १८ ते ३५ | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | खादी व ग्रामोद्योग अंतर्गत असलेल्या उद्योगातील प्रशिक्षित उमेदवारांना प्राधान्य. | ५० टक्केपेक्षा जास्त असणार नाही. ५० टक्केपेक्षा कमी असणार नाही. |
| टीप: सचिव संवर्गात पुढील बढतीच्या सवलती उपलब्ध नसल्याने ५० टक्के पदे सचिव संवर्गातून संवर्ग बदलातून भरण्यात यावीत. सचिवांना सहाय्यक तथा टंकलेखकाच्या पदोंही संवर्ग बदलाच्या ५० टक्के संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. परंतु संवर्गबदलासाठी सचिव या पदावर किमान ५ वर्षे सेवा आवश्यक आहे. | | | | | | | | |
| २७. | सचिव (बलुतेदार संस्था) (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | २९४. | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य लेखा डिप्लोमा इन को ऑपरेशन परिक्षा उत्तीर्ण. | | निवडीने ५० टक्के |
| | | | बढतीने | | | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण. | १) खाते परिक्षा उत्तीर्ण. २) सहा. सचिव पदावरील ५ वर्षाचा अनुभव. | बढतीने ५० टक्के ज्येष्ठतेनुसार |
| २८. | वाहन चालक (सारथी) (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | ७ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १) एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण २) जड किंवा हलके वाहन चालविण्याचा आर.टी.ओ. परवानाधारक. | जीप, कार, टेम्पो, ट्रक इत्यादी पैकी आवश्यकतेनुसार वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| टीप: वाहन चालक (सारथी) पद भरताना शासनाच्या प्रचलित भरती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. | | | | | | | | |

e. barati.doc

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९. | नाईक (वर्ग-४) ७७५-१२-९५५-द.रो.१५-१०३०-२०-११५०. | ९ | बढतीने | | | इयत्ता ४ थी पास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक. तसेच इंग्रजी अद्याक्षरे व अंक वाचता येणे आवश्यक. | शिपाई कामाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव. | |
| ३०. | दप्तरबंद (वर्ग-४) ७७५-१२-९५५-द.रो.१५-१०३०-२०-११५० | ३ | बढतीने | | | इयत्ता ४ थी परिक्षा उत्तीर्ण मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक तसेच इंग्रजी अद्याक्षरे व अंक वाचता येणे आवश्यक | शिपाई कामाचा सलग ३ वर्षाचा अनुभव | |
| ३१. | मास्टर पॉटर (वर्ग-४) ७७५-१२-९५५-द.रो.१५-१०३०-२०-११५० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १) इयत्ता ४ थी परिक्षा उत्तीर्ण<br>२) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३) कुंभार उद्योगाचे प्रशिक्षण पूर्ण | कुंभार उद्योगातील कामाचा १ वर्षाचा अनुभव | पॉटरीत उद्योगाचे ज्ञान आवश्यक पॉटरीत प्रशिक्षण घेतलेल्याला उमेदवारास प्राधान्य |
| ३२. | रोनिओ चालक (वर्ग-४) ७७५-१२-९५५-द.रो.१५-१०३० (सदर पद १९८३ पासुन अस्तित्वात आहे) | १ | बढतीने | | | किमान ४ थी पास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक तसेच इंग्रजी आद्याक्षरे व अंक वाचता येणे आवश्यक. | शिपाई/चौकीदार या पदावरील ५ वर्षाचा अनुभव | |
| ३३. | सहा. सचिव (बलुतेदार सोसायट्या (वर्ग-४) ७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० | २९४ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | इयत्ता ४ थी पास किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण | | |
| ३४. | शिपाई/चौकीदार (वर्ग-४) ७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० | ७८ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | ४ थी इयत्ता उत्तीर्ण व मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | | |

## महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आस्थापनेवरील विविध पदांचे सुधारीत सेवाभरती नियम

| अ.क्र. | पदाचे नाव व वेतन श्रेणी | मंजूर पदे | सेवा भरतीची पध्दती | वयोमर्यादा (वर्षे) सर्वसाधारण | वयोमर्यादा (वर्षे) अनुसूचित जाती /जमाती व इतर | शैक्षणिक पात्रता | अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | संचालक मध (वर्ग-२) २०००-६०-२३००-द.रो-७५-३२००-१००-३५०० | १ | निवडीने/ बढतीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | जीवशास्त्र किंवा रसायनशास्त्र विषयासह विज्ञान शाखेतील पदवी परिक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा विज्ञान शाखेतील पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण | १) मधुमक्षिका पालन उद्योगातील व्यवस्थापकीय पदावरील ५ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>२) सहा. विकास अधिकारी / संशोधन अधिकारी व रसायन शास्त्रज्ञ या पदावरील कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव आवश्यक | |
| | टीप:- १) मंडळाच्या वरील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवडीसाठी वयाची अट शिथील राहील. | | | | | | | |
| २) | संशोधन अधिकारी (१) सहा.विकास अधिकारी १ (वर्ग-३) १६४०-६०-२६००-द.रो. ७५-२९०० | २ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | जीवशास्त्र विषयासह विज्ञान शाखेतील द्वितीयश्रेणी पदवीधर किंवा जीवशास्त्र विषयासह विज्ञान शाखेतील पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण | मधुमक्षिका पालनातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | |
| | टीप :- सदर पदाचे खालील पद " ज्येष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक " असे आहे. मात्र संशोधन अधिकारी / सहा. विकास अधिकारी या पदाचे कामकाज व ज्येष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक या पदाचे कामकाज भिन्न स्वरुपाचे असल्यामुळे खालील पदामधून बढतीने सदरचे पद भरणे योग्य वाटत नाही. | | | | | | | |
| ३) | रसायन शास्त्रज्ञ-मध- (वर्ग-३) १६४०-६०-२६००-द.रो.-७५-२९०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | रसायन / जीवशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेचा द्वितीय श्रेणी पदवीधर किंवा रसायन शास्त्र विषयासह विज्ञान शाखेतील पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण | रसायन शास्त्रज्ञ / जीवशास्त्रज्ञ या पदावरील अनुभव असल्यास प्राधान्य | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | निरिक्षक, (मध) (वर्ग-३) १२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४० | २ | बढतीने | — | — | एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण | पर्यवेक्षक (मध) या पदावरील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| टीप :- यापूर्वीचे सेवाप्रवेश नियम पाहता मधुमक्षिका पालन उद्योगाअंतर्गत अ.क्र. ४ येथे ज्येष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक / निरिक्षक असे पदनाम दर्शविण्यात आलेले आहे. तथापि नियोजन विभागाचे शासन निर्णय क्रमांक इएसटी-१०८४/सीआर-१/डब्ल्युजीडी, दि.१३ मार्च, ८४ नुसार "निरीक्षक" या पदाची असुधारित वेतनश्रेणी रु.३६५-७६० (सुधारित वेतनश्रेणी रु.१४००-२३००) अशी असतांना मंडळाने शासनाकडे चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रस्तावात अनवधनाने रु. १२००-२०४० अशा वेतनश्रेणीचा प्रस्ताव सादर केला व त्याप्रमाणे शासनाकडून मंजूरी मिळाली. या चुकीची दुरुस्ती आता पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये करणे आवश्यक आहे. मात्र ज्येष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक हे पद रु.१२००-२०४० या वेतनश्रेणीतील असल्यामुळे दोनही पदांचे स्वतंत्रपणे सुधारित भरती नियम करण्यात आलेले आहेत. | | | | | | | | |
| ५) | ज्येष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक (मध) (वर्ग-३) १२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४० | १ | बढतीने | — | — | एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण | प्रयोगशाळा सहाय्यक विक्रेता तथा प्रयोग निर्देशक या पदावरील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| ६) | प्रयोगशाळा सहाय्यक (मध) (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो २५-१५०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | एस.एस.सी. | प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | |
| ७) | पर्यवेक्षक (मध) (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो. २५-१५०० | ५ | बढतीने | — | — | एस.एस.सी. उत्तीर्ण | क्षेत्रिक (मध) या पदावरील कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक | |
| ८) | विक्रेता तथा प्रयोग निर्देशक (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | एस.एस.सी. | — | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९) | क्षेत्रिक (मत्स्य) (वर्ग-३) ९५०-२०-११[illegible]०-द.रो.-२५-१४०० | ४० | निवडीने<br><br>बढतीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | एस.एस.सी. किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण | वनविभाग किंवा कृषी विभागातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br><br>मत्स्य सहाय्यक म्हणून ३ वर्षे कामाचा अनुभव, ज्येष्ठतेनुसार वर्ग / वर्ग-४ या सवर्गातील कर्मचाऱ्यासाठी शासनाने प्रचलित केलेल्या नियमानुसार | मत्स्य व्यवसायाची माहिती असल्यास आवश्यक. |
| १०) | मत्स्य सहाय्यक (मत्स्य) (वर्ग-४) ७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० | ४ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | ४ थी इयत्ता उत्तीर्ण व मराठीचे ज्ञान आवश्यक | | |
| ११) | प्रयोगशाळा मदतनीस-(मत्स्य) (वर्ग-४) ७५०-१२-८७०-द.रो.-१४-९४० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | ४ थी इयत्ता उत्तीर्ण मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | | |

## महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आस्थापनेवरील विविध पदांचे सुधारीत सेवाभरती नियम

| अ. क्र. | पदांचे नाव व वेतनश्रेणी | मंजूर पदे | सेवा भरतीची पध्दती | वयोमर्यादा सर्व साधारण | वयोमर्यादा अनुसूचित जाती/जमाती व इतर | शैक्षणिक पात्रता | अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | संचालक (हातकागद) (वर्ग२) २०००-६०-२३००-द.रो.७५-३२००-१००-३५००. | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | रसायन शास्त्रासह विज्ञान शाखेतील पदवी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण किंवा विज्ञान शाखेतील पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण | १) हातकागद उद्योगातील वरिष्ठ व्यवस्थापकीय पदावरील ५ वर्षाचा अनुभव. २) हातकागद /कागद उद्योगातील पदव्युत्तर उमेदवारास प्राधान्य | |
| | | | बढतीने | | | वरीलप्रमाणे | ३) रसायन शास्त्रज्ञ या पदावरील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक | |
| | टीप:- मंडळातील रसायन शास्त्रज्ञ वरील पात्रता धारण करीत नसल्यास हे पद निवडीने भरता येईल. | | | | | | | |
| २) | रसायन शास्त्रज्ञ (हातकागद) (वर्ग३) १६४०-६०-२६००-द.रो. ७५-२९०० | १ | बढतीने | --- | | रसायन शास्त्रासह विज्ञान शाखेतील पदवीधर | सहाय्यक रसायन शास्त्रज्ञ या पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक | |
| ३) | सहाय्यक रसायन शास्त्रज्ञ (हातकागद)(वर्ग-३) १४००-४०-१६००-५०-२३००-द.रो. ६०-२६०० | १ | निवडीने / बढतीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | रसायन शास्त्रासह विज्ञान शाखेतील पदवीधर | हातकागद उद्योगातील अनुभव असल्यास प्राधान्य निरिक्षक हातकागद पदावरील ५ वर्षाचा अनुभव आणि रसायन शास्त्रासह विज्ञान शाखेतील पदवीधरास प्राधान्य. | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | निरिक्षक हातकागद (वर्ग-३) १२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४० | ३ | निवडीने<br>बढतीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १) एच.एस.सी.(विज्ञान शाखा) किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२) हातकागद उद्योगातील कनिष्ठ पाठ्यक्रम पूर्ण असला पाहिजे | प्रयोगशाळा सहाय्यक पदावरील ३ वर्षाचा अनुभव | ३३ टक्के जागा बाबतीत [illegible] |
| ५) | प्रयोगशाळा सहाय्यक (वर्ग-३) - ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | विज्ञान विषयासह एच.एस.सी परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | प्रयोगशाळेतील अनुभव असल्यास प्राधान्य | |
| ६) | मिस्त्री (हातकागद) (वर्ग-३) ९५०-२०-११५०-द.रो.२५-१४०० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | १) एस.एस.सी किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण<br>२) शासकीय/शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सुतार कामाचे प्रशिक्षण पूर्ण | सुतार कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | |
| ७) | पयदर्शी यंत्र चालक (वर्ग-४) (हातकागद) ७५०-१२-८७०-द.रो.१४-९४० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | इयत्ता ४ थी उत्तीर्ण मराठी/हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक | | |
| ८) | प्रयोगशाळा मदतनीस (वर्ग-४) (हातकागद) ७५०-१२-८७०-द.रो. १४-९४० | १ | निवडीने | १८ ते ३० | १८ ते ३५ | इयत्ता ४ थी परिक्षा उत्तीर्ण<br>मराठी/हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक | | |